महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर


मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ 21 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 263 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# आता राज्यात सीबीएसई पॅटर्न

## मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत सूचना

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील 100 दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला होता. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला होता. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. दरम्यान, त्या बैठकीत मुख्यमंत्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना केल्या होत्या.



## शिक्षणमंत्र्यांची घोषणा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच स्टेट बोर्ड शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष 2025-2026 या वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढील लागावी या हेतूने सरकारने हा निर्णय घेतला आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात आज सभागृहात माहिती देत घोषणा केली. विशेष म्हणजे यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतरही त्यांनी राज्यात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यासंदर्भात आढावा सुरू असल्याचे म्हटले होते.

राज्य अभ्यासक्रम आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संदर्भात सुकाणू समितीने मान्यता दिली असून मंत्री दादा भुसे यांनी विधान परीषदेतील प्रश्नावर लेखी उत्तर देत माहिती दिली. भाजप नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर दिले. राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली का? असा प्रश्न आमदार प्रसाद लाड यांनी विचारला होता. त्यावर, सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करुन दिली जाणार असून 1 एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार असल्याचे उत्तर दादा भुसे यांनी दिले.






## हायकोर्टाने ठाणे मनपाला फटकारले



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** 'मशिदीचे बांधकाम अवैध असल्याचे कळले असताना, आणि त्याविषयी मूळ जमीनमालकांनी अनेकदा तक्रारी केलेल्या असताना अधिकाऱ्यांनी वेळीच कारवाई का केली नाही? ते बांधकाम रोखण्यात का आले नाही?', अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने ठाणे महापालिकेला फटकारले आहे. तसेच, ते अवैध बांधकाम तोडण्याची केलेली अर्धवट कारवाई आता रमझान ईदनंतर १४ एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचा निर्वाणीचा आदेशही दिला आहे. ठाणे जिल्ह्यातील बोरिवडे गावातील सर्वे क्रमांक ४६ ही १८ हजार १२२ चौरस मीटरची जमीन न्यू श्री स्वामी समर्थ बोरिवडे हाऊसिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या मालकीची आहे. त्या जमिनीतील काही भागावर गाझी सलाउद्दीन रेहमतुल्ला हूल ऊर्फ परदेशी बाबा ट्रस्टने अतिक्रमण केले आणि त्याठिकाणी अवैधरित्या एकमजली मशिद बांधण्यात आली. म्हणून कंपनीने महापालिकेकडे तक्रारी केल्या होत्या. मात्र, त्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे कंपनीने ॲड. कुणाल द्वारकादास यांच्यामार्फत रिट याचिका करून ट्रस्टला आणि त्या ट्रस्टच्या विश्वस्तांना प्रतिवादी केले होते.

## अंबरनाथ तालुक्यातील शेतकऱ्यांचे भूसंपादना विरोधात उपोषण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ:** ज्या जमिनी पिढ्यानपिढ्या सांभाळून ठेवल्या, त्या शेत जमिनीचा मोबदला घेऊन काय करणार? आम्हाला जमिनीचा मोबदला नको, जमिनी परत करा. अशी मागणी करत पालेगाव आणि फणशीपाडा येथील शेतकरी एमआयडीसी भूसंपादन विरोधात गेल्या तीन दिवसांपासून आमरण उपोषणास बसले आहेत. एमआयडीसीचा विस्तार आणि लघु उद्योगासाठी एमआयडीसीने अंबरनाथ तालुक्यातील मौजे पाले मधील ७८.६४ हेक्टर (१९४ एकर जागा) शेतकऱ्यांना आवश्यक मोबदला देऊन भूसंपादन केली होती, मात्र त्यातील काही शेतकऱ्यांनी जमिनीचा मोबदला न घेता आमच्या शेतजमिनी आम्हाला कसायच्या असून त्या परत द्या, अशी भूमिका घेऊन त्यांनी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. उपोषणाच्या आजच्या तिसऱ्या दिवशी देखील एमआयडीसी अथवा शासनाचा प्रतिनिधी उपोषण ठिकाणी फिरकला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

भूसंपादनाच्या विरोधात आमरण उपोषणास बसलेल्या बाळाराम सांबारे परिवाराची १८ एकर जमीन एमआयडीसीने ताब्यात घेतली आहे. मात्र ही जमीन शेतीची जमीन असून आम्हाला ती परत द्या, अशी भूमिका सांबारे परिवाराने घेतली आहे. त्यामुळे आता एमआयडीसीच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

एमआयडीसीसाठी ताब्यात घेतलेल्या जमिनीचा मोबदला न्यायालयात जमा केला आहे. प्रांत कार्यालयात अर्ज करून संबंधित शेतकऱ्यांनी मोबदला घ्यायचा आहे, अशी माहिती एमआयडीसीचे विभागीय अधिका री सुनील भुताळे यांनी दिली.

# कल्याण- डोंबिवलीकरांना केडीएमसीचा 'अर्थ दिलासा!'

## कोणतीही करवाढ नसलेला तीन हजार तीनशे कोटींचा अर्थसंकल्प



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण : कल्याण-डोंबिवलीच्या नागरीकांवर कोणतीही करवाढ न करता कल्याण डोंबिवली महापालिकेने ३ हजार ३६१ कोटी रुपये खर्चाचा अर्थसंकल्प आज सादर करण्यात आला. या आर्थसंकल्पास महापालिका आयुक्त डॉ इंदूराणी जाखड यांनी मान्यता दिली आहे. अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ करण्यात आली नसल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

अत्याधुनिक पद्धतीने कचरा गोळा केला जाणार आहे. अत्याधुनीक वाहने, धूळ शमनसाठी वाहने. नागरीकांच्या तक्रारींचे निवारण विकसीत केले आहे. उत्पन्न वाढीसाठी वेगवेगळी पावले उचलली आहे. महापालिका हद्दीतील मालमतांचे सर्वेक्षण करुन उत्पन्नात वाढ केली जाणार आहे. सरकारच्या नियमानुसार कॅपिटल व्हॅल्यू बेस करण्याकरीता सल्लागाराची नियुक्ती. टॅक्स लावणे आणि समजून घेणे सोपे होणार आहे. नवी कर आकारणी आहे. बेकायदा बांधकामांच्या कर आकारणीवर बंदी घातली गेली आहे.

### अर्थसंकल्पात बेकायदा बांधकामाबाबत कडक निर्णय

**कल्याण डोंबिवली शहरात विविध रस्ते व फुलांचे काम सुरु आहेत. त्याला गती देण्यासाठी विविध उपाययोजना बजेटच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत. बेकायदा बांधकाम आढळल्यास त्याचे निष्काशन करण्याकरीता येणाऱ्या खर्चाच्या दहा पटीने दंड आकारण्यात येणार आहे. जेणेकरून बेकायदा बांधकामांना आळा बसेल. बेकायदा पाणी कनेक्शन घेणाऱ्यांना मोठा आर्थिक दंड आकारण्यात येणार आहे. मालमत्तांचे सर्वेक्षण सुरु असून प्रत्येक मालमत्तेला नवी आयडी आणि जीआयएस मॅपिंग करुन घेणार आहे. पाणी कनेक्शनची माहिती घेणार आहे.**

# बारवी धरणग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न सोडवा


## आ. किसन कथोरेंची विधानसभेत लक्षवेधी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** ठाणे जिल्ह्यातील बहुतांश शहरांना, औद्योगिक वसाहतींना पाणी पुरवठा करण्यासाठी बारवी धरणाची उभारणी आणि विस्तार करण्यात आला. मात्र या धरणासाठी जमिनी देणाऱ्या स्थानिकांचे प्रश्न अद्याप सुटलेले नाहीत. यातील काहींना नोकरीची प्रतिक्षा आहे, काहींना मोबदला आणि त्यावरील वाज मिळालेले नाही. तिसऱ्या टप्प्यानंतर ६१ हेक्टर अतिरिक्त क्षेत्र पाण्याखाली गेले. मात्र त्याचे भूसंपादन करण्यात आलेले नाही. त्यामुळे हे प्रश्न तातडीने सोडवण्याची मागणी आमदार किसन कथोरे यांनी विधानसभेत केली.

झपाट्याने वाढणाऱ्या ठाणे जिल्ह्याची पाण्याची तहाण भागवण्याचे महत्वाचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी धरणामुळे शक्य झाले. बारवी धरणाची स्थापना १९७२ च्या सुमारास झाली असली तरी बारवीचे तिसऱ्या टप्प्याचे विस्तारीकरण पाच वर्षांपूर्वी पूर्णत्वास आले. धरणाची उंची वाढवली असली तरी भूसंपादनाचा योग्य मोबदला मिळत नसल्याने धरणात पाणी साठवले जात नव्हते. अखेर निळवंडे धरणाच्या धर्तीवर मोबदला, त्यात सरकारी नोकरी देण्याचे निश्चित झाल्यानंतर बारवी धरणात अतिरिक्त पाणी साठवले गेले. बारवी धरणामुळे ठाणे जिल्ह्याची तहाण भागली गेली. मात्र धरणग्रस्तांच्या मोबदल्याचा प्रश्न निकाली निघाला नाही. मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी बुधवारी अर्थसंकल्पीय अधिवेनशात बारवी धरणाचा मुद्दा उपस्थित केला. धरणाच्या विस्तारासाठी जागा भूसंपादित केल्या. मात्र त्यांना देय असलेले व्याज दिले गेले नाही. त्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्य बैठकीत झाला. मात्र व्याजाची रक्कम मिळाली नाही, अशी माहिती कथोरे यांनी सभागृहात दिली. तसेच तिसऱ्या टप्प्यातील लाभार्थ्यांना लाभ मिळाला नाही. त्यामुळे तिसऱ्या टप्प्यातील लाभ तसेच पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील लाभार्थांना व्याज कधी लाभ मिळणार असा प्रश्न कथोरे यांनी उपस्थित केला.

बारवी धरणाच्या विस्तारीकरणात तिसऱ्या टप्प्यात अतिरिक्त ६१ हेक्टर क्षेत्र पाण्याखाली गेले. मात्र त्याचा मोबदला मिळाला नाही. धक्कादायक म्हणजे पाच वर्षांनंतरही याची भूसंपादन प्रक्रिया सुरूच झाली नाही. त्यामुळे ती प्रक्रिया कधी पूर्ण करणात असाही प्रश्न कथोरे यांनी उपस्थित केला. त्यावर बोलताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी लाभार्थ्यांच्या मोबदल्याचे वाज १५ दिवसात वितरीत करण्याचे आश्वासन दिले.



**बारवी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाण्याखाली गेलेल्या 61 हेक्टर अतिरिक्त क्षेत्राची भूसंपादन प्रक्रिया एमआयडीसी प्रशासन सरु करणार असल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. तसेच लाभार्थ्यांना देय असलेली व्याजाची रक्कम 3 कोटी 51 लाख असल्याचेही सामंत यांनी सांगितले आहे.**

**बारवी धरण विस्तारीकरण प्रकल्पात एकूण १ हजार २०४ बाधित होते. त्यातील १ हजार १३६ लाभार्थ्यांनी नोकरी आणि मोबदल्यासाठी अर्ज केले होते. त्यातील ६३ जणांनी १० लाखांचा मोबदला स्विकारला, तर ५७८ लाभार्थी नोकरीसाठी पात्र ठरले. विभक्त कुटुंबामुळे काही जण अपात्र ठरले. तसेच टप्पा एक आणि टप्पा दोनमधील २०३ लाभार्थी आहेत. त्यांनाही इतर पालिकांमध्ये समाविष्ट करण्यासाठी पालिकांना सांगितले जाणार आहे.**



# मुंबई - बदलापूर मेट्रोने जोडले जाणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबई आणि बदलापूरला मेट्रोने जोडण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) कांजूरमार्ग ते बदलापूर मेट्रो १४ मार्गिका प्रस्तावित केली असून ३८ किमीची ही मार्गिका आता लवकरच मार्गी लागणार आहे. मेट्रो १४ मार्गिकेच्या पर्यावरणीय प्रभाव अहवाल तयार करण्यासह वन आणि पर्यावरणासंबंधीची मंजुरी घेण्याची प्रक्रिया पार पाडण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. सल्लागाराच्या नियुक्तीसाठी बुधवारी एमएमआरडीएकडून निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सल्लागाराची नियुक्ती आणि पुढील कार्यवाही करून वर्षभरात मेट्रो १४ मार्गिकेच्या कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबई, मिरा-भाईंदर, ठाणेवासियांपाठोपाठ बदलापूरवासियांचेही मेट्रोचे स्वप्न आता लवकरच पूर्ण होईल. एमएमआरडीएच्या ३३७ किमीच्या मेट्रो मार्गिकेतील १४ मेट्रो मार्गिकेचे काम केव्हा सुरु होणार याची प्रतीक्षा बदलापूरवासियांना होती. कारण ही मेट्रो मार्गिका थेट मुंबई आणि बदलापूरला जोडणार आहे. त्यामुळे ही मार्गिका सेवेत दाखल झाल्यास दीड ते दोन तासांचा प्रवास काही मिनिटांत होणार असल्याने ही मार्गिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

# ठाण्यात कचरा समस्या : काँग्रेसकडून ढोल बडवत निषेध




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून कचरा उचलला जात नसल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाने ठाणे महापालिका मुख्यालयासमोर बुधवारी कचरा टाकून आंदोलन केले. त्यापाठोपाठ काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनीही गुरूवारी पालिका मुख्यालयासमोर धरणे धरत ढोल वाजवून कचरा समस्येविरोधात अनोखे आंदोलन केले.ठाणे येथील सीपी तलाव परिसरातील कचरा हस्तांतरण केंद्रावर कचऱ्याचे ढीग लागले आहेत. त्यातून दुर्गंधी पसरत असून त्याचबरोबर आग लागून धुर परिसरात पसरत आहे. याचा त्रास होत असल्यामुळे स्थानिकांसह शिंदेच्या शिवसेनेने येथे कचरा टाकण्यास विरोध केला.

कचरा टाकण्यासाठी शहरात जागा नसल्यामुळे कचरा संकलन ठप्प झाले होते. पालिकेने आता आतकोली येथे कचरा नेण्यास सुरूवात केली असली तरी, घरोघरी कचरा संकलन पुर्णपणे क्षमतेने सुरू होऊ शकलेले नाही. यातूनच शहरातील रस्त्यांवर आणि गृहसंकुलांबाहेर कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत. यामुळे पालिकेच्या कारभारावर नागरिकांकडून टिका होत असतानाच, आता राजकीय पक्षांनी आंदोलन सुरू केली आहेत. कचरा उचलला जात नसल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाने ठाणे महापालिका मुख्यालयासमोर बुधवारी कचरा टाकून आंदोलन केले. त्यापाठोपाठ काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनीही गुरूवारी पालिका मुख्यालयासमोर धरणे धरत ढोल वाजवून कचरा समस्येविरोधात अनोखे आंदोलन केले.

काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आणि ठाणे प्रभारी चंद्रकांत पाटील, प्रदेश सचिव संतोष केणी, ठाणे शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण याच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी हातात विविध घोषणांचे फलक घेत सत्ताधारी तसेच प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली. तसेच ढोल वाजवून मुख्यालयाचा परिसर दणाणून सोडला. तसेच ठाणे महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले. यावेळी ठाणे काँग्रेस चे प्रवक्ते राहुल पिंगळे, महिला अध्यक्ष स्मिता वैती, शिल्पा सोनोने, सेवादल अध्यक्ष रवी कोळी, प्रदेश पदाधिकारी राजेश जाधव यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# गीतासार



अध्याय ५

**कर्मसंन्यासयोगः**

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः । अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ॥ ५-१५ ॥

सर्वव्यापी परमेश्वरही कोणाचेही पापकर्म किंवा पुण्यकर्म स्वतःकडे घेत नाही. परंतु अज्ञानाने ज्ञान झाकले गेले आहे. त्यामुळे सर्व अज्ञानी लोक मोहित होतात. ॥ ५-१५ ॥

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः । तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥ ५-१६ ॥

परंतु ज्यांचे ते अज्ञान परमात्मज्ञानाने नाहीसे झाले आहे, त्यांचे ते ज्ञान सूर्याप्रमाणे त्या सच्चिदानंदघन परमात्म्याला प्रकाशित करते. ॥ ५-१६ ॥

तद्बुद्धयस्त दात्मानस्त न्निष्ठास्त त्परायणाः । गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥ ५-१७ ॥


ज्यांचे मन व बुद्धी तद्रूप झालेली आहे आणि सच्चिदानंदघन परमात्म्यातच ज्यांचे नित्य ऐक्य झाले आहे, असे ईश्वरपरायण पुरुष ज्ञानाने पापरहित होऊन परम गतीला प्राप्त होतात. ॥ ५-१७ ॥

विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥ ५-१८ ॥

ते ज्ञानी पुरुष विद्या व विनय यांनी युक्त असलेल्या ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा, आणि चांडाळ या सर्वांना समदृष्टीनेच पाहातात. ॥ ५-१८ ॥

## रेसिपी

# मुळ्याचा पाला



**साहित्य**

मुळ्याचा पाला
मुगाची भिजवलेली डाळ
तेल, मोहरी, हिंग, जिरे
लसूण
मीठ आणि तिखट

**कृती**

मुळ्याचा पाला कधीही कच्चा खाऊ नका. मुळ्याचा पाला स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर तो बारीक चिरून घ्या.

गॅसवर कढई गरम करायला ठेवा. कढई गरम झाल्यानंतर तेल, मोहरी, हिंग, जिरे आणि लसूण टाकून फोडणी करून घ्या.

त्यानंतर कांदा परतून घ्या आणि मग मुळ्याचा पाला टाकून तो सुद्धा परतून घ्या. चवीनुसार मीठ आणि तिखट घाला. नंतर झाकण ठेवून थोडी वाफ येऊ द्या. यामध्ये तुम्ही हरबऱ्याची किंवा मुगाची भिजवलेली डाळसुद्धा घालू शकता.

मुळ्याचा पाला खाण्याचे फायदे

१. मुळ्याचा पाला खाल्ल्याने कफ, पित्त, वात असे तिन्ही दोष कमी होतात.

२. किडनीस्टोन किंवा मुत्रविकाराचा त्रास कमी होण्यासाठी मुळ्याचा पाला खाणे फायदेशीर ठरते.

हिवाळ्यात कोरड्या पडलेल्या त्वचेला द्या 'हे' सुपरटॉनिक! ५ पदार्थ खा- ड्राय त्वचा होईल मुलायम

३. अपचनाचा किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल तर मुळ्याचा पाला नियमितपणे खाल्ल्यास नक्कीच फायदा होईल.

४. मुळ्याच्या पाल्यातून व्हिटॅमिन ए, सी, कॅल्शियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात मिळते.

५. मुळव्याधीचा त्रास कमी करण्यासाठीही मुळ्याचा पाला खाणे फायदेशीर ठरते.

# राष्ट्राच्या उभारणीसाठी शेतकऱ्यांचे योगदान

जहा डाल डाल पर सोनेकी चिडीया
करती है बसेरा वो भारत देश है मेरा



या हिंदी चित्रपटातील गीताप्रमाणे प्राचीन काळी भारत हा सुवर्ण रत्नांची खाण होती याचे यथार्थ वर्णन वरील गीतात दिसत आहे. प्राचीन काळी भारतात म्हणे सोन्याचा धूर निघत होता येथे सोन्याचा अर्थ सोन्याच्या धातू एवढाच मर्यादित नाही. भारतात मिळणारी धनधान्य म्हणजे त्यावेळच्या भारतीयांचे सोनेच होते मानवाच्या मूलभूत गरजा म्हणजे अन्न वस्त्र निवारा मानवाला अंगभर वस्त्रे नसले तरी चालेल निवारा नसेल तर तो ढोलीत अथवा उघड्यावर झोपेल परंतु अन्न नसेल तर त्याचा जीवनगाडा चालणार नाही म्हणून म्हटलं आहे अन्नासाठी दाही दिशा आम्हा फिरवीशी दाही जगदीशा हे काही खरे खोटे नाही. आपला देश प्राचीन काळापासून अन्नधान्याने समृद्ध होता ज्या देशात अन्नधान्य मुबलक आहे त्या देशाचे भवितव्य उज्वल असते. संपूर्ण जग मसाल्याच्या पदार्थासाठी आपल्या देशावर अवलंबून होते व आहेत यातच आपल्या देशाचे मोठेपण आहे. अन्नधान्याने समृद्ध अशा भारताला काळाकुट्ट अंधाराने घेरल परकीय शत्रूंनी आक्रमणे केली भारतातील स्वतःच्याच विचार करणाऱ्या राजे राजवाड्यांचा पराभव करून सत्ता काबीज केली येथील सोनेनाणे तसेच अन्नधान्याची कोठारे लुटली आपल्या वाळवंटी साम्राज्यात नेली भारताला कंगाल करून सोडले.

यानंतरच्या काळात ब्रिटिशांनी थोडी दीडशे वर्षे राज्य कले संपूर्ण देशाला गुलाम केले त्यांनी ज्या काही सुधारणा केल्या त्या त्याचं स्वार्थ पाहून केल्या येथील संपत्ती लुटण्यासाठी त्यांनी सरंजामदार, खोत, सावकार यांना हाताशी धरून त्याला सर्व जमिनी देऊन त्यांना जमीनदार बनवले आणि शेतकरी हा शेतमजूर झाला शेतकरी कष्ट करून पीक घेत होते त्यातील अर्धा हिस्सा सावकाराला द्यावा लागत होता . परंतु ही गोष्ट साधी नव्हती हे सावकार त्याला मिळालेल्या धान्याच्या हिश्यातील काही रक्कम इंग्रजांना देत होते इंग्रजांनी जणू शेतकऱ्यांना लुटले त्यामुळे शेतकरी गरिबीतून बाहेर पडलाच नाही सावकार गडगंज झाले त्यांनीही शेतकऱ्यांना जगू दिले नाही इंग्रज सरकारने जमवलेली संपत्ती जनतेसाठी न वापरता आपल्या देशाचा खजिना भरला शेत पिकवणारा शेतकरी वंचितच राहिला.

आपल्या देशातील कापूस कवडीमोल भावाने खरेदी करून तो इंग्रजांनी इंग्लंडला नेला तेथे त्याचे कापड बनवले व मॅंचेस्टर क्लॉथ या नावाने भारतात विक्री चढ्या भावाने केली त्याच मॅंचेस्टर कापसाला आपल्याकडील अज्ञानी लोक मांजरपाट म्हणून खरेदी करू लागले. कापसाच्या कमी किमतीमुळे शेतकरी गरीबच राहिला व त्यांचे कापड चढ्या भावाने देऊन इतर लोकांचे नुकसान झाले याला पिळवणूक नाही तर काय म्हणावे? इंग्रजी सत्तेमुळे आपला तोटा झाला परंतु त्यातच एक आपला फायदा झाला कधी नव्हे तो देश एकसंघ झाला त्यामुळे स्वातंत्र लढ्याला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र आपले लोकशाही सरकार सत्तेवर आले आपले सरकार आले म्हटल्यावर आपल्या हक्कासाठी लोक थोडेच गप्प बसणार. शेतकरी कुटुंबातील नेते मंडळींनी सरंजामी, खोतकी, सावकारी पद्धती बदलण्यासाठी आंदोलने उभारली शेतकऱ्यांनी आपला आवाज सरकार दरबारी मांडला पण प्रथमदर्शनी सरकारला जाग आली नाही आंदोलन अधिक तीव्र झाले .अलिबाग तालुक्यातील चरी येथे शेतकऱ्याने सरंजामा विरुद्ध आंदोलने केली नंतरच सरकारला जाग आली. शेतकऱ्यांच्या मागणीला सरकारने मान्यता दिली. कसेल त्याची जमीन म्हणजे कुळ कायदा पास झाला. जे शेतकरी कसत होते तो त्या जमिनीचा मालक झाला मात्र त्यासाठी अल्प किंमत मोजावी लागली ही जमीन म्हणजे 32 ग ची जमीन होय. येथूनच खऱ्या अर्थाने माझी जमीन म्हणून शेतकरी जोमाने कसू लागला त्याला स्वतःची जाणीव झाली हळूहळू आपला देश धनधान्य समृद्ध होऊ लागला सरहद्दीवर पहारा देणारा जवान व अन्नधान्याने पिकवणारा शेतकरी हे दोन्ही जणू भारताचा कणा आहेत हेच शेतकरी व जवान यांचे योगदान पाहून भारताचे भूतपूर्व पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान जय किसान हा नारा दिला.

भारतात औद्योगिक क्रांती झाली आपल्या शेतकऱ्यांच्या कच्चा मालापासून कारखान्यात पक्के उत्पादन होऊ लागले शेतकऱ्यांना त्याच्या शेत मालाला योग्य ती किंमत मिळाल्याने त्यांचा आर्थिक स्तर उंचावू लागला. आपल्याला पुरेल इतके धान्य ठेवून बाकी सरकार जमा करू लागले. आपण आपले धनधान्य ,फळ फळावर, मसाल्याचेही पदार्थ आपण इतर देशांना निर्यात करू लागलो त्यामुळे आपल्याला परकीय चलन मिळाले हे आपल्या देशाच्या उभारणीत महत्त्वाचे पाऊल आहे. यामध्ये शेतकऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे.

लेखक
श्री गिरीधर पिंगळे
खालापूर रायगड-
९८२३७७९६०६

भारत हा शेतीप्रधान देश आहे शेतीसाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर केला आहे तसेच शेतकऱ्यांच्या माहितीसाठी कृषीविषयक शिबिरे घेतली नवनवीन कृषी महाविद्यालये, कृषी संशोधन केंद्र निर्माण केली. संकरित बियाण्यांची निर्मिती केली जेणेकरून शेतीत जास्तीत जास्त उत्पन्न कसे मिळेल त्याचा विचार झाला वर्षात तीन वेळा शेतकरी पिके घेऊ लागला.

भारतीय शेती ही पावसावर अवलंबून आहे शेतकऱ्यांनी खूप काबाडकष्ट केले शेतात पीकही चांगले आले परंतु पावसाने मध्येच दडी मारली तर उभे पीक करपून जाते. प्रमाणापेक्षा जास्त पाऊस पडला तर जोमाने आलेले पीक जमीन दोस्त होते. कधी किडीचा प्रादुर्भाव झाला उदाहरणार्थ खोडकिडा, मावा, तुडतुडे , टोळधाड यामुळे उभे पीक नष्ट होते अशावेळी शेतकऱ्यांनी शेतीसाठी बँक अथवा सावकारी कर्ज काढले असेल तर तो कर्जाचा हप्ता कसा भरणार? या विवंचनेने त्याचे मन स्वस्थ बसत नाही त्याला आत्महत्ये खेरीज दुसरा पर्यायच उरत नाही. त्याला जगावेसे वाटते. सगळी नाटके करता येतात परंतु पैशाचे नाटक करता येत नाही.

आत्महत्येवर उपाय म्हणून सरकारने शेतकऱ्यांची कर्ज माफ केली आहेत परंतु कर्ज माफ करणे व त्यावरील उपाय नव्हे तर शेतकऱ्यांना उन्हाळी शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिल्यास वर्षभरात तीन पिके घेता येतील कीटकनाशकांचा पुरवठा करून दिल्यास शेतकऱ्याला फायदा होईल. सरकारने चांगल्या बियाण्यांची उपलब्धता करून द्यावी .पिकांसाठी योग्य मोबदला देणे आवश्यक आहे. निसर्गाचा प्रकोप झाला शेतीवर संकट आले तर नुकसान भरपाई द्यावी आता तर अल्प रक्कम भरून पीक विम्याची सोय करून दिली आहे. त्याचा शेतकऱ्याला फायदा होईल व आत्महत्येचे प्रमाण निश्चित कमी होईल यात तिळमात्र शंका नाही.

आपल्या देशातील शेतकऱ्यांच्या याच योगदानामुळे आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत जगात अग्रेसर आहे आपल्या शेजारील देशांचा विचार केल्यास पाकिस्तान श्रीलंकेला आपल्या देशाच्या मानाने सर्व वस्तू व अन्नधान्याच्या बाबतीत किमतीत दहा ते वीस पटीने महाग आहे हे फार बोलके उदाहरण आहे. या देशांची अन्नधान्यात किती दयनीय अवस्था आहे आपणास ठाऊक आहेच.

भारताची लोकसंख्या अशाच पद्धतीने वाढणार असेल तर जमीन तीच मात्र खाणारी तोंडे वाढणार असतील . आपण पिकविलेले अन्नधान्य अपुरे पडणार म्हणून अंथरून पाहूनच पाय पसरावे हे नक्की खर एका कवीनेच आपल्या भाषेत सांगितले आहे की घामाचे गाळूया मोती मग पिकेल जोमाने शेती शेत शिवारी कणसे डवरली कणाकणातच लक्ष्मी दिसली.

### जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते

# जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रदर्शनाचे उद्घाटन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण ठाणे जिल्ह्यात जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे व जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांच्या पुढाकारातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिद्धी विविध माध्यमांद्वारे सुरु करण्यात आली आहे.



यानुषंगाने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्याकरिता आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात माहिती फलकांद्वारे शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली असून या प्रदर्शनाला जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या सामान्य नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप, जिल्हाधिकारी महोदयांचे स्वीय सहाय्यक गिरीष काळे, निवृत्त उपअभियंता मोहन पवार, निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी रणवीरसिंह राजपूत, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे म्हणाले की, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालय यांच्या विविध कामांपैकी प्रामुख्याने करावयाचे काम म्हणजे केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचविणे. यामध्ये ठाणे जिल्हा माहिती कार्यालय निश्चितपणे अग्रेसर आहे. आज या प्रदर्शनाच्या माध्यमातून त्यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणारे स्टॅन्डीजचे प्रदर्शन भरविले आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसिद्धीचे काम आणखी वेगाने व प्रभावीपणे होणार आहे. समाजातील प्रत्येक वर्गासाठी, जसे की शेतकरी, महिला, कामगार, विद्यार्थी व मुलींसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा एकत्रितपणे गोषवारा तयार करून एका विशिष्ट दिवशी त्या सर्व योजनांची प्रसिद्धी करणे हे उद्दिष्ट त्यांनी ठेवले आहे.

या नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून आपल्याला जनतेपर्यंत केंद्र व राज्य शासनाच्या योजना पोहोचविण्यामध्ये निश्चितपणे यश मिळेल. या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचतील व प्रभावी अंमलबजावणी करता येऊ शकेल, असे सांगून ते पुढे म्हणाले की, जनतेच्या सहभागाशिवाय आणि सहकार्याशिवाय कोणतीही योजना यशस्वी होऊ शकत नाही. योजनेमध्ये किंवा त्याच्या अंमलबजावणीमध्ये जनतेचा सकारात्मक प्रतिसाद आम्हाला अपेक्षित आहे आणि तो निश्चितपणे मिळेल याची मला खात्री आहे.

प्रदर्शन, डिजिटल वॉलद्वारे प्रसिद्धी, क्यू आर कोड, शासकीय योजना चित्रफिती व सोशल मिडीया प्रसिद्धी, व्हिडिओ क्रिएटिव्ह, जिल्ह्यातील तलावांवरील चित्रफिती, मोबाईल स्टॅन्डद्वारे प्रसिद्धी, मोबाईल व्हॅन, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांची सोशल मिडियाद्वारे प्रसिद्धी अशा विविध माध्यमांद्वारे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची प्रचार-प्रसिद्धी करण्यात येत असून जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# कोरावळे सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी शंकर धुमाळ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ठाणे जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुभाष पवार यांच्या नेतृत्वाखाली नुकताच मुरबाड येथे ता.२० मार्च २०२५ रोजी सहकारी संस्थेच्या कार्यालयामध्ये कोरावळे सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी शंकर धुमाळ यांची निवड करण्यात आली आहे. सहकार अधिकारी श्रेणी -२ राजेंद्र पडघणे यांनी निवडणूक म्हणून काम पाहिले. तर सुभाष पवार यांनी नवनिर्वाचित चेअरमन शंकर धुमाळ यांचे शाल व फुलगुच्छ देऊन अभिनंदन केले.

यावेळी विद्यमान संचालक माजी चेअरमन पांडुरंग धुमाळ, माजी चेअरमन तथा पत्रकार बाळासाहेब भालेराव, माजी चेअरमन भगवान गोल्हे, तसेच संचालक म्हणून हरी धुमाळ, सावळाराम धुमाळ, मारुती धुमाळ, रघुनाथ धुमाळ, दशरथ तरे, सुनिल गोल्हे,मंगळ भांडे,अलका धुमाळ, गुलाब धुमाळ, तसेच संस्थे सचिव संतोष मोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

# अंबरनाथ मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड 'फकीरा' ने प्रभावित

## नाट्यगृहास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नामकरण संघर्ष समितीची भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : अंबरनाथ नगर परिषदेच्या माध्यमातून सर्कस मैदानात उभारलेल्या नाट्यगृहास लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे नाव द्यावे यासाठी अनेक पुरोगामी संघटना प्रयत्नशील आहेत. शिष्ट मंडळांने याच मागणी साठी आज अंबरनाथचे नवनियुक्त मुख्याधिकारी तथा प्रशासक उमाकांत गायकवाड यांची भेट घेतली. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नामकरण संघर्ष समितीने गायकवाड यांना अण्णाभाऊ साठे लिखित फकिरा कादंबरी भेट



दिली. यावेळी उमाकांत गायकवाड यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या विद्वत्ता व साहित्य कृतींनी आपण भारावल्याचे सांगितले. यावेळी समितीचे उपाध्यक्ष शत्रुघन उमप यांनी माहिती दिली की, "फकीरा" ही केवळ साहित्यकृती नसून ती संघर्ष, बंडखोरी आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रतीक आहे. नामकरण संघर्ष समितीच्या या उपक्रमातून अण्णाभाऊ साठे यांच्या विचारधारेचा प्रसार आणि समाजाला प्रेरणा देण्याचा उद्देश आहे. यासाठी या नाट्यगृहास अण्णाभाऊ साठेचे नाव मिळावे यासाठी ५० हून अधिक पुरोगामी संघटना संस्थेकडून पालिकेला निवेदन देण्यात आले आहे.

या मागणीस सकारात्मक प्रतिसाद दिलाय. यावेळी विजय हनवते, सुनील आहीरे,अजय राव चिरिवेला, सुंदरलाल डांगे, विलास यादव, हरिभाऊ चव्हाण, प्रल्हाद कसबेकर, किशोर अल्हाट, प्रफुल्ल थोरात, केशरभाऊ लोणारे, दिपक खंडागळे , नामदेव हवाळे, भीमराव इंगोले आदी शिष्टमंडळात उपस्थित होते.

# 'आरटीई' प्रवेशासाठी २४ मार्चपर्यंत कागदपत्र पडताळणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्ह्यातील बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार, दरवर्षीप्रमाणे २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. मंगळवारी, दि. १८, मार्च २०२५ रोजी प्रतिक्षा यादी टप्पा क्रमांक ०१ मधील २ हजार ७०५ विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या पालकांना टेक्स्ट मेसेज (SMS) पाटविण्यात येत आहे.





पालकांनी केवळ टेक्स्ट मेसेज (SMS) वर अवलंबून न राहता RTE PORTAL वरील 'अर्जाची स्थिती' या टॅबवर आपल्या बालकांचा अर्ज क्रमांक टाकून अर्जाची स्थिती पहावी, तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे अवलोकन करावे. प्रतिक्षा यादीतील बालकांच्या पालकांनी अलोटमेंट लेटर व आवश्यक कागदपत्रे घेऊन विहित मुदतीत नजिकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन पडताळणी समितीकडून दि. २४ मार्च, २०२५ रोजीपर्यंत कागदपत्रांची तपासणी करून आपल्या बालकांचा ऑनलाईन प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि नृत्येश्वर फाउंडेशन ऑफ आर्ट्स अँड कल्चर यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार दिनांक २१ मार्च रोजी सायंकाळी ७:३० वाजता कल्याणच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम होत आहे. यामध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चारित्रावर आधारित नाट्य संगीत, नृत्य, माहितीपट असा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून इतिहासाच्या सुवर्ण पानांवरची प्रेरणादायी गाथा अनुभवण्यासाठी अवश्य उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केली आहे.

### पैसे घेत असलेल्या व्हायरल व्हिडीओ प्रकरणी

# केडीएमसी कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : केडीएमसीच्या जे प्रभागातील फेरीवाला पथक प्रमुख कर्मचाऱ्यांचा पैसे घेत असताना सोशल मिडिया वर व्हायरल झालेल्या व्हिडीओ प्रकरणात अखेर प्रशासनाने निलंबन कारवाईचा बडगा उगारला आहे. याबाबत राष्ट्र कल्याण पार्टी, महासचिव राहुल काटकर यांनी आयुक्तांना लेखी पत्र व व्हिडिओ दिला होता. या तक्रारीच्या अनुषंगाने भगवान पाटील यांना त्वरित निलंबित करण्यात आले.कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती जे अंतर्गत फेरीवाला अतिक्रमण विभागाचे पथक प्रमुख भगवान पाटील, कामगार हे प्रभाग समिती कार्यालयाच्या परिसरात अज्ञात व्यक्तीकडून पैसे स्वीकारत असल्याबाबत आणि ठराविक फेरीवाल्यांवर कारवाई करण्याबाबत संभाषण करत असल्याची व्हिडिओ क्लिप समाज माध्यमांवर प्रसिद्ध झाली होती. या घटनेच्या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने संबंधित कर्मचाऱ्यास कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

या नोटीसला संबंधित कर्मचारी भगवान पाटील यांनीदिलेला खुलासा विपर्यस्त असल्यामुळे प्रशासनाने खुलसा अमान्य केला. तसेच या व्हिडिओ क्लिप मध्ये भगवान पाटील हे अज्ञात इसमाकडून कार्यालयीन परिसरात पैसे स्वीकारून स्वतःच्या खिशात टाकत असल्याचे दिसून आल्यामुळे व त्यांच्या सचोटी बद्दल शंका निर्माण करणारे संभाषण या व्हिडिओ क्लिप मध्ये असल्यामुळे प्रशासनाने त्यांचा खुलासा अमान्य करून त्यांना तात्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. तसेच त्यांची विभागीय चौकशी करण्याचाही निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती केडीएमसी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी दिली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# जिल्हास्तरीय दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा उत्साहपुर्ण संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हास्तरीय दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा डोंबिवली, जिमखाना येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. मंगळवारी, दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी जलतरण स्पर्धा व बुधवारी, दिनांक १९ मार्च, २०२५ रोजी मैदानी क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहाने पार पडल्या. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अस्तित्व संस्थेच्या अध्यक्षा राधिका गुप्ते यांनी सर्व पालक, शिक्षक वर्ग यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांचा शाळेत सराव घेऊन त्यांना मैदानी क्रीडा स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी तयार केले, त्याकरिता त्यांनी शिक्षकांचे कौतुक केले.

जिल्हास्तरिय क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांकाने पहिल्या येणाऱ्या खेळांडूची निवड राज्यस्तरिय क्रीडा स्पर्धेकरिता करण्यात येत असून सर्व पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना राष्ट्रीय खेळासाठी तयारी करण्याबाबत समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे यांनी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी समाज कल्याण विभागातील सहाय्यक सल्लागार संगिता शिर्के, ७०० विद्यार्थी, १७५ सहभागी कर्मचारी वर्ग, ११५ पालक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना रत्नाकर सोनावणे यांनी दिव्यांग बालकांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. खेळ मुलांसाठी महत्त्वाचे असून आनंद आणि तणाव विरहित मुले जास्त कार्यक्षम होण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या असतात, असे प्रतिपादन केले.

अंध प्रवर्गातील क्रीडा स्पर्धा या अंतर्गत ८ ते १२ वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पासिंग द बॉल, २५ मीटर धावणे, १२ ते १६ वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५० मीटर धावणे, बुद्धिबळ, उभे राहून लांब उडी मारणे, १६ वर्षांवरील विद्यार्थ्यांसाठी १०० मीटर धावणे, बुद्धिबळ, उभे राहून लांब उडी मारणे, तर बहु विकलांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी तोल सांभाळून डोक्यावर वस्तू घेऊन चालणे, अपूर्ण चित्र पूर्ण करणे, ५० मीटर धावणे या स्पर्धा मोठ्या उत्साहाने पार पडल्या. कर्णबधिर प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी गोळा फेक, लांब उडी, ५० मीटर धावणे, पोहणे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मतिमंद प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५० मीटर धावणे जागेवरून लांब उडी, गोळा फेक अशा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नाकर सोनावणे, नितीन हरड यांनी उत्तमरीत्या केले आहे.

# कल्याणच्या प्रस्तावित धरणांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करा



## - आ. विश्वनाथ भोईर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना आमदार विश्वनाथ भोईर यांनी शहरातील पाण्याचा व कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीत नागरी जमिनी धारणा कायदा (यू.एल.सी.) अंतर्गत वितरित केलेल्या व पडून असलेल्या सदनिका वितरण व विनियोग बाबत प्रश्न मांडला. मुंबई, ठाण्यानंतर कल्याण डोंबिवली हे सर्वात वेगाने विकसित होणारी शहरं असून भविष्याच्या पुढील २५ वर्षांचा विचार करता राज्य शासनाने प्रस्तावित दोन्ही धरणांबाबत अर्थसंकल्पात तातडीने तरतूद करण्याची आग्रही मागणी आमदार विश्वनाथ भोईर यांनी केली आहे. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यांवर बोलत असताना पाण्यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यावर शासकीय यंत्रणांकडून होत असलेल्या चालढकलीवर आमदार विश्वनाथ भोईर यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रासाठी सध्या उल्हास आणि काळू नदी अशा दोनच नद्यांचे पाण्याचे स्रोत आहेत. त्यातही उल्हास नदीमधून ३६५ आणि काळू नदीतून ५ दशलक्ष लीटर पाणी कल्याण डोंबिवली महापालिकेला पुरवलं जातं. मात्र आत्ताच्या लोकसंख्येनुसार जवळजवळ ४६ दशलक्ष लिटर अधिक पाण्याची आवश्यकता असून अद्याप मे महिना येणे बाकी असल्याचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी सांगितले. तसेच एप्रिल-मे महिन्यामध्ये ही पाण्याची पातळी एकदम खाली जाते आणि कल्याण डोंबिवली शहरांमध्ये अनेक ठिकाणी पाणीटंचाईचा प्रश्न भेडसावू लागतो.

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रामध्ये आपल्यासह राजेश मोरे, सुलभा गायकवाड आणि रवींद्र चव्हाण असे चार आमदार असून नगरसेवक नसल्याने आम्हाला दररोज नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. तर कल्याण डोंबिवलीच्या स्वतंत्र धरणासाठी आम्ही अनेक वेळा मागणी केली असून शासनाकडून आम्हाला प्रत्येक वेळेला नविन धरणाचे गाजर दिले जात असल्याचा संतापही भोईर यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच काळू धरण हे विस्थापितांच्या प्रश्नामुळे होऊ शकत नाहीये आणि कुशीवली धरणाचं काम हे अत्यंत संथगतीने सुरू आहे. अशा परिस्थितीत कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील वाढते शहरीकरण पाहता रजिस्ट्रेशन ऑफिसमध्ये दररोजचे कमीत कमी चार-पाचशे रजिस्ट्रेशन होतात, म्हणजे दररोज जर एवढे रजिस्ट्रेशन होत असेल तर किती लोक या भागामध्ये राहायला येतात याचा विचार करायला पाहिजे आणि ही वाढीव पाण्याची जी मागणी आहे ती पूर्ण होत नसल्याची उदासीनता आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी व्यक्त केली.

# 'नव तेजस्विनी महोत्सव २०२५' भव्य प्रदर्शनाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी "नव तेजस्विनी महोत्सव 2025" हा भव्य प्रदर्शन व विक्री मेळावा महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत गुरुवार दि. 20 ते मंगळवार दि. 20 मार्च, 2025 दरम्यान सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे आयोजीत करण्यात आला आहे. अशी माहिती महिला आर्थिक विकास महामंडळाने दिली आहे.या भव्य प्रदर्शन व विक्री मेळाव्यात महाराष्ट्रातील 140 पेक्षा जास्त स्टॉल्स सहभागी होणार आहेत. विविध जिल्ह्यांतील महिला बचतगटांनी तयार केलेली उत्कृष्ट उत्पादने प्रदर्शित केली जाणार आहेत. हस्तकला, बांबू उत्पादने, हामतग वस्त्रप्रकार, पारंपरिक ग्रामीण उत्पादने यासारख्या विविध उत्पादनांचा आनंद या प्रदर्शनात घेता येणार आहे. खवैयांसाठी ग्रामीण शेतकरी महिला गटांव्दारे तयार केलेले खास परंपरिक पदार्थ उपलब्ध होणार आहेत.

या महोत्सवाच्या उद्धटन समारंभाला मान्यवर उपस्थित राहणार असून, विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी हे प्रदर्शन एक उत्तम व्यासपीठ ठरणार असून, महिला बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी आणि महिलांच्या आर्थिक स्वयंपूर्णतेला चालना देण्यासाठी माविम "सुवर्ण महोत्सव नव तेजस्विनी 2025" हा एक महत्त्वाचा उपक्रम ठरणार आहे. या प्रदर्शनाला नागरीकांनी आवर्जून भेट द्यावी. तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून येणाऱ्या महिलांच्या कुशल हातांनी तयार केलेल्या साहित्य व वस्तुंची खरेदी करावी, असे आवाहन महिला आर्थिक विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक महेंद्र गमरे यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

# रखडलेल्या रस्त्याबाबत शिवसेना शाखा प्रमुखाचा उपोषणाचा इशारा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्र. २७ चिकणघर गावठाण, मधील व्ही-टेन बिल्डींग (पिंपळाचे झाड) ते अनंत रेजन्सी (बॉक्स नाला) पर्यंतच्या महापालिकेकडून सुरु असलेल्या ९ मिटर रस्त्याच्या कामात एका बाजुस भुयारी गटार बांधताना पिण्याच्या पाण्याची लाईन शिफ्ट करण्यासाठी गेल्या महिनाभरापासून दिरंगाई होत असून रखडलेल्या या रस्त्याबाबत चिकणघर गावठाणचे शाखा प्रमुख चेतन म्हामुणकर यांनी दिनांक २४ मार्च सोमवार पासून उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला असून याबाबत त्यांनी केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांना पत्र दिले आहे.

प्रभाग क्र. २७ चिकणघर गावठाण, मधील व्ही टेन बिल्डींग (पिंपळाचे झाड) ते अनंत रेजन्सी (बॉक्स नाला) पर्यंतच्या महापालिकेकडून सुरु असलेल्या ९ मिटर रस्त्याच्या एका बाजुस भुयारी गटार बांधुन पावसाचे पाणी सांडपाणी योग्य पद्धतीने जाण्याकरीता या ठिकाणी असलेली पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन शिफ्ट करणे अत्यंत गरजेचे आहे. जेणे करुन राममंदिर, जुना मनिषा नगर, स्वानंद कॉलनी परिसर, साती आसरा मंदिर परिसर - या परिसरांतून येणाऱ्या पावसाचे पाणी व सांडपाण्याचा बॉक्स नाल्यात योग्य पद्धतीने निचरा होऊन, नागरिकांची होणाऱ्या पूरपरिस्थीतीतुन कायम स्वरुपी सुटका होईल.

हे काम करण्या बाबत वारंवार अर्ज-निवेदन देऊनही महापालिका पाईप लाईन शिफ्ट करण्याच्या कामात अडथळा आणणाऱ्यांना पाठिशी घालत आहेत, त्याचा निषेध म्हणून सोमवार दि. २४ मार्च पासून अनंत रेजन्सी (बॉक्स नाला) येथे उपोषण सुरु करत असल्याचा इशारा चेतन म्हामुणकर यांनी पालिका आयुक्तांना पत्राद्वारे दिला आहे.

# ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना २०२४ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत घोषणा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्राचा सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेला २०२४ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना जाहीर झाला आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.

याबाबत दिलेल्या निवेदनात मुख्यमंत्री म्हणाले, राम सुतार हे ज्येष्ठ शिल्पकार आहेत. त्यांचे वय सध्या १०० वर्ष असून अजूनही ते शिल्प तयार करण्याचे काम करीत आहेत. इंदू मिल येथे निर्माणाधीन असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती तयार करण्याचे कामही राम सुतार करीत आहेत.


या पुरस्कार निवडीबाबत १२ मार्च २०२५ रोजी निवड समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत राम सुतार यांचे नाव २०२४ च्या पुरस्कारासाठी मान्यता देण्यात आली. या पुरस्कारचे स्वरूप २५ लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह व शाल असे आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# पालघरच्या ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे पूर्ण करणार

## - मंत्री इंद्रनील नाईक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पालघर जिल्ह्यातील डोंगराळ आणि अतिदुर्गम भागात असलेल्या रस्त्यांची सुधारण करण्यात येऊन रस्ते चांगल्या दर्जाची करण्यात येतील. दाभेरी ते बोपदरी या राज्य मार्गावर २.९ किलोमीटर आंतराच्या रस्ता सुधारणा कामास कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. तसेच दाभेरी - राहूळ - सागपाणी या प्रमुख जिल्हा मार्गाचे काम सुरू असून दोन्ही रस्ते मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येतील, असे सार्वजनिक बांधकाम



राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांबाबत सदस्य राजेंद्र गावित यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य जयंत पाटील यांनीही सहभाग घेतला.

मंत्री नाईक म्हणाले, दाभेरी ते डाळ या रस्त्यावर राज्य परिवहन महामंडळाची बस सेवा सुरू आहे. ज्या मार्गावर बस सेवा बंद आहे, त्या मार्गावर बससेवा सुरू करून जनतेची गैरसोय दूर होईल.

या चर्चेदरम्यानच्या उपप्रश्नाला उत्तर देताना मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले, पालघर जिल्ह्यात वाढवण बंदर होत आहे या बंदरामध्ये 26 टक्के वाटा राज्य शासनाचा आहे. बंदराच्या निर्मितीनंतर भारत जगात मोठी टर्मिनल क्षमता असलेल्या देशांच्या पंक्तीत जाऊन बसणार आहे. त्यामुळे या भागातील पायाभूत सोयी- सुविधा निर्माण करण्यावर शासन भर देणार आहे.

# राज्यात यंदा ४४ लाख क्विंटल कापसाची खरेदी

## - मंत्री जयकुमार रावल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यात यंदाच्या वर्षी १८ मार्च २०२५ रोजीपर्यंत सीसीआय म्हणजेच कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून ४४ लाख क्विंटल कापसाची खरेदी पूर्ण झाल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य अभिजीत वंजारी यांनी अल्पकालीन चर्चेदरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री रावल बोलत होते. यावेळी सदस्य सदाभाऊ खोत, अमोल मिटकरी, परिणय फुके, अरुण लाड यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून राज्यात कापूस खरेदी केंद्र उघडण्यात येतात आणि त्यांच्याकडूनच कापसाची खरेदी केली जाते असे सांगून मंत्री रावल म्हणाले की, यंदा कापसाला लांब धाग्यासाठी ७ हजार ५२१ रुपये तर मध्यम धाग्यासाठी ७ हजार १२१ रुपये हमीभाव देण्यात येत आहे. कापूस खरेदीसाठी राज्यात १२४ खरेदी केंद्र सुरू करण्यात आली आहेत. कापूस खरेदीनंतर त्याच्या जिनींग आणि प्रेसिंगची प्रक्रिया केली जाते. त्यासाठी सप्टेंबर ते सप्टेंबर असा करार प्रेसिंगवाल्यांसोबत केलेले असतात. त्यामुळे कापूस खरेदी बंद नसल्याचे मंत्री रावल यांनी स्पष्ट केले.

सोयाबीन संदर्भात बोलताना मंत्री रावल म्हणाले की, जवळपास ११ लाख २१ हजार टन सोयाबीन यंदा खरेदी करण्यात आले आहे. त्याशिवाय तूर, मुग, उडीद, हरभरा या पिकांचीही खरेदी हमीभावाने होत आहे. या पिकांनाही चांगला हमीभाव देण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी शासन कायमच प्रयत्नशील असून राज्यात सिंचन क्षमतेत वाढ करण्यात येत आहे. सिंचनाच्या चांगल्या सोयी निर्माण झाल्या पाहिजेत. तसेच खासगी बाजार समित्यांच्या बाबत धोरण राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याची माहितीही मंत्री रावल यांनी सभागृहात दिली.

# द्राक्ष शेतावरील प्लास्टिक आवरणावर अनुदान देण्यास शासन सकारात्मक

## - मंत्री दादाजी भुसे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : द्राक्ष फळ पीके संवेदनशील आहे. अवकाळी पाऊस, गारपीट तसेच वादळ वारा यामुळे द्राक्ष फळ पिकाचे नुकसान मोठ्या प्रमाणावर होते. द्राक्ष फळ पिकाच्या शेतीवर प्लास्टिक आवरण असल्यास होणारे नुकसान टाळता येऊ शकते. यासाठी शासन प्लास्टिक आवरणासाठी अनुदान देण्यास सकारात्मक आहे, असे मंत्री दादाजी भुसे यांनी आज विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.द्राक्ष उत्पादकांच्या समस्या बाबत सदस्य रोहित पवार यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य जयंत पाटील, दिलीप बनकर, विश्वजीत कदम यांनीही सहभाग घेतला.

मंत्री भुसे म्हणाले, शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन काही व्यापारी द्राक्ष माल खरेदी करतात. मात्र काही प्रकरणात शेतकऱ्यांना पैसे न दिल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यास अशा प्रकरणात पोलीस कारवाई करण्यात येते. जुलै ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाने नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादकांचे झालेल्या नुकसानीपोटी १९३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच नोव्हेंबर ते डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या नुकसानीपोटी ९६ लक्ष रुपये नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. सांगली जिल्ह्यातही या कालावधीत झालेल्या नुकसानीपोटी ८०५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ही मदत जमा करण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करण्यात येणार आहे.

शासन कोरडवाहू शेतीचे नुकसान झाल्यास प्रति हेक्टरी १३ हजार ६००, बागायती २७ हजार ५०० आणि फळबाग नुकसानीपोटी ३६ हजार रुपये नुकसान भरपाई देते. या नियमानुसार फळबाग नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल, असेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

# राजकीय पक्षांनी यादीभाग निहाय बीएलए यांची नेमणूक करावी

## - जिल्हाधिकारी किशन जावळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : मतदार याद्या अचूक व दोषविरहित असणे आवश्यक आहे. मतदार याद्या तयार करण्याच्या प्रक्रियेत राजकीय पक्षांची भूमिका महत्त्वाची आहे. तरी राजकीय पक्षांनी यादीभाग निहाय बीएलए यांची नेमणूक करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

मतदार याद्या तयार करणे त्यांचे पुनरिक्षण व अद्यावतीकरण करण्याच्या अनुषंगाने राजकीय पक्षाशी स्थानिक स्तरावर विचार विनिमय करुन त्यांच्या सूचना घेण्याच्या अनुषंगाने (दि.19 मार्च ) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) नितीन वाघमारे, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे आदि उपस्थित होते.

यावेळी माहिती देताना जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले की दि.19 मार्च 2025 रोजी रायगड जिल्हयामध्ये पुरुष मतदार 12 लाख 8 हजार 926, स्त्री मतदार-12 लाख 52 हजार 340 तर तृतीय पंथी मतदार 95 असे एकूण मतदार संख्या 25 लाख 33 हजार 361 इतकी आहे. या सर्व मतदार यादीभागाचा बीएलओ व राजकीय पक्ष यांनी नेमलेले बीएलए यांच्यामार्फत मतदार यादी पडताळणी केली जाईल. यामुळे यादीतील मयत, स्थलांतरीत, दुबार मतदारांची वगळणी करणे, मतदारांच्या तपशीलात दुरुस्ती करणे अधिक सुलभ होईल. सर्व राजकीय पक्षांनी या कामास प्राधान्य द्यावे असेही त्यांनी सांगितले.

मतदार नोंदणी ही एक निरंतर प्रक्रीया आहे. 01 जानेवारी, 01 एप्रिल, 01 जुलै व 01 ऑक्टोबर या चार अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादी अद्यावत केली जाते. ज्या मतदारांचे अर्हता दिनांकाला 18 वर्षे पूर्ण होत नसली तरी पुढील अर्हता दिनांकावर 18 वर्षे पूर्ण होत असतील तर सदर नवीन मतदाराकडून फॉर्म नमूना नंबर 6 भरुन घेतला जातो व अर्हता दिनांकाला 18 वर्ष पूर्ण होताच सदर फॉर्मवर प्रोसेस केली जाते. मतदार नोंदणी ही ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने केली जाते.

फॉर्म न.6 - नवीन मतदार नोंदणी फॉर्म 6 ए अनिवासी भारतीय, यांची मतदार नोंदणी, फॉर्म नं.7 - मयत स्थलांतरीत दुबार नावांची वगळणी, फॉर्म. नं 8 नांव, फोटो, रहिवास पत्ता इ. मतदारांच्या तपशीलामध्ये बदल याबाबत लोकप्रतिनिधी 1950 व मतदार नोंदणी नियम 1960 तरतूदीनुसार पडताळणी करुन नवीन मतदारांची नोंदणी, बदल व वगळणी करण्यात येते. मतदार नोंदणी ही संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे ऑफलाईन पध्दतीने अर्ज भरुन व Voter Helpline ॲपद्वारे/Voter Service Portal यावर ऑनलाईन मतदार नोंदणी करता येते.




# कुळगांव - बदलापूर नगरपालिकेचा करवसुलीचा अनोखा फंडा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर: कुळगांव बदलापूर नगरपालिका क्षेत्रात घरपट्टी न भरणाऱ्या थकबाकीदारांची नावे बॅनर द्वारे शहराच्या मुख्य चौकात चौकात लावण्यात आली आहेत. बदलापूर पूर्व आणि पश्चिमेकडील अनेक महत्त्वांच्या चौकात मोठ्या मोठ्या तक थकबाकीदारांची नावे बॅनर द्वारे झळकवण्यात आली आहेत. विशेष म्हणजे त्या थकबाकी दारांमध्ये शहरातील अनेक नामवंत उद्योजक, बांधकाम व्यवसायिक, नागरिक अशांचा समावेश आहे. कुळगांव बदलापूर नगरपालिकेने यंदा 100% मालमत्ता करसुलीचे उद्दिष्ट ठेवलं आहे. त्यासाठी बदलापूर नगरपालिका प्रशासन हे शहरातील सर्व मालमत्ताधारकांनी कर वेळेत भरावा या संदर्भात सर्व थकबाकीदार मालमत्ताधारकांना मागणी पत्रकाच्या नोटीस घेऊन मालमत्ता कर तातडीने भरण्याचं आवाहन करत आहे. तसेच 31 मार्च नंतर मालमत्ता कर न भरणाऱ्या कर दात्यांना जप्ती आणि पेनल्टी सारख्या कारवाईला सामोरे जावं लागणार आहे. त्यामुळे यापासून बचावासाठी नागरिकांनी लवकरच घर पट्टी जमा करण्याचं आवाहन कुळगांव बदलापूर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक मारुती गायकवाड यांनी केलं आहे. थकीत घरपट्टी वसुली मोहिमे संदर्भात कुळगांव बदलापूर नगरपालिका प्रशासनाने गेल्या आठवड्यात सात विविध पथकांच्या द्वारे बदलापूर शहरातील थकीत घरपट्टी धारकांपर्यंत पोहोचून त्यांना नोटीस बजावल्या आहेत. तर मोठ्या मोठ्या थकबाकीदारांवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. या माध्यमातून कारवाई केल्यानंतर गेल्या काही दिवसात बदलापूर शहरात राहणाऱ्या थकबाकीदारांनी घरपट्टी भरण्सुयास सुरुवात केली आहे. वाणिज्य वापरातील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या सिल करण्याचं काम आता नगरपालिका प्रशासनाने हाती घेतला असून एमआयडीसीतील लाखो रुपये कर थकवणाऱ्या कंपन्या सील करण्यात आल्या आहेत.

# गो हत्येचा गुन्हा : कडक कारवाई करणार - देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गोहत्याप्रकरणी वारंवार गुन्हे नोंद होत असतील, तर अशा लोकांवर संघटित गुन्हेगारी कायदा (मकोका) अंतर्गतही गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिला. आ. संग्राम जगताप यांनी श्रीगोंदा तालुक्यातील ससाणेनगर भागात घडलेल्या वाद, मारहाण, त्यातून मृत्यू होणे, तसेच तेथील कुरेशी कुटुंबियांची दहशत, यासंबंधी लक्षवेधी सूचना विचारली होती. त्यावरील उत्तरात मुख्यमंत्री बोलत होते. फटाके वाजवण्यावरुन मातंग समाजातील ससाणे आणि इतर अकरा लोकांना मारहाण झाली. त्यानंतर ससाणे यांच्या मृत्यू झाला. सव्वा महिन्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला, याबाबत संग्राम जगताप सभागृहात बोलत होते. येथे आणि संपूर्ण जिल्ह्यात गोतस्करी, गोहत्या यासह अनेक व्यवसाय असलेल्या कुरेशी गँगची दहशत आहे. कुरेशीवर 18 ते 20 गुन्हे दाखल आहेत, असे जगताप यांनी निदर्शनास आणले. या सर्व प्रकरणी स्थानिक पोलीस निरीक्षक यांचा हलगर्जीपणा कारणीभूत आहे, असा गंभीर आरोपही त्यांनी केला. तसेच गोहत्या, गोतस्करी विरोधात कठोर कायदा करण्याची मागणी केली.

## संक्षिप्त

### विशाल गवळीप्रकरणी हलगर्जीपणा नाही

**- मंत्री योगेश कदम**

मुंबई : ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील आरोपी विशाल गवळीवर विनयभंगाचे व इतर असे एकूण नऊ गुन्हे कोळसेवाडी पोलीस स्टेशन येथे दाखल आहेत. या गुन्ह्यांमध्ये आरोपी विशाल गवळी व अन्य पाच ते सहा गुन्हेगारांनी मानसिक रुग्ण असल्याच्या प्रमाणपत्राआधारे विनयभंग, छेडछाड अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये जामीन मिळविल्याचे आढळून आलेले नाही. तसेच या प्रकरणी पोलीस विभागाने हलगर्जीपणा केलेला नाही. त्यामुळे त्याबाबतची चौकशी करण्याची आवश्यकता नसल्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत सांगितले.सदस्य शशिकांत शिंदे यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. सदस्य ॲड. अनिल परब यांनी या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सहभाग घेतला. गृहराज्यमंत्री श्री.कदम म्हणाले, विशाल गवळीवर एकूण नऊ गुन्हे दाखल असून त्यातील आठ गुन्ह्यांमध्ये जामीन प्राप्त झालेला आहे. तर, एका गुन्ह्यामध्ये विशाल गवळी सध्या अटकेत आहे. त्यास मानसिक रुग्ण म्हणून जामीन मिळालेला नाही. विशाल गवळीला पाठीशी घालण्याचा प्रश्नच येत नसून त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. त्याच्यावर एमपीआयडी सारखा गुन्हा दाखल करता येईल का, हे देखील तपासून पाहिले जाईल, असेही श्री. कदम यांनी सांगितले.

### वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी नवीन प्रकल्प

**- ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील वीज निर्मिती सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून टप्प्याटप्प्याने नवीन प्रकल्प कार्यान्वित होत आहेत. तसेच भविष्यात वीज पुरवठा अधिक सक्षम केला जाईल, असे ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानपरिषदेत सांगितले.राज्यात महानिर्मितीचे पाच संच बंद असल्याने विजेचा तुटवडा निर्माण होत असल्याबद्दल सदस्य मनिषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर बोलत होत्या. राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले की, वीज निर्मिती संच बंद असण्याची ही पहिली वेळ नसून नियमित देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी काही संच बंद ठेवावे लागतात तसेच तांत्रिक बिघाडांमुळे काही संच बंद राहतात.

प्लान्ट लोड फॅक्टर (PLF) बाबत महाराष्ट्राचा दर हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च दर आहे. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार 2030 पर्यंत काही जुने प्रकल्प चालू ठेवण्याची गरज आहे. त्यामुळे सरकार आणि खासगी वीज निर्मिती कंपन्यांची तुलना योग्य नाही, असे त्यांनी सांगितले.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी स्पष्ट केले की, जानेवारी महिन्यात 82.5 दशलक्ष युनिट वीज खरेदी करण्यात आली असून तिचा दर 3.31 रुपये प्रति युनिट होता. हा दर खासगी कंपन्यांच्या तुलनेत अधिक नव्हता. तसेच, सरकारकडील जुने वीज प्रकल्प टप्प्याटप्प्याने नव्या तंत्रज्ञानाने अद्ययावत केले जात आहेत. भुसावळ येथे 660 मेगावॅटचा नवीन प्रकल्प कार्यान्वित होत असून, चंद्रपूरमध्ये 800 मेगावॅटचा प्रकल्प प्रगतीपथावर असल्याचे राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

### पडघ्यात विवेकानंद प्रतिष्ठानची व्याख्यानमाला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघे येथे विवेकानंद प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी प्रमाणे यावर्षीही व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे हे १६ वे वर्ष असून दरवर्षी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, धार्मिक या विषयावरती व्याख्यानमाला होत असते. यावर्षी या व्याख्यानमालेत "राम कथेचे" आयोजन करण्यात आले असून, सदर राम कथेचे कथन प्रसिद्ध कार्पोरेट कीर्तनकार समीर लिमये हे करणार आहेत. दिनांक २१, २२ व २३ मार्च रोजी रात्री साडेनऊ वाजता पडघा येथील श्री दत्त संस्थान मंदिर ट्रस्टच्या प्रांगणात सदर रामकथेचा कार्यक्रम होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून व्याख्यान मालेच्या श्रवणसुखाचा लाभ घ्यावा असे आवाहन विवेकानंद प्रतिष्ठान यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अंबरनाथ- बदलापूरात अभय योजना लागू करावी

**- आमदार किसन कथोरे यांची मागणी**




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अंबरनाथ बदलापूर नगरपालिका हद्दीत पाणी बिलाची वसुली करण्यासाठी अभय योजना लागू करावी अशी मागणी मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी केली आहे. मंत्रालयात राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांची भेट घेऊन त्यांनी ही मागणी केली. यावेळी भाजपचे पूर्वेचे शहराध्यक्ष संजय भोईर पश्चिमेच्या शहराध्यक्ष शरद तेली माजी नगरसेवक किरण भोईर उपस्थित होते.

अंबरनाथ आणि बदलापूर येथे पाण्याची समस्या काही भागात असल्यामुळे नागरिक आपले पाणी बिल भरत नाहीत. त्यामुळे त्यावर विलंब म्हणून व्याज आकारले जाते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अनेक ठिकाणी सक्षमपणे पाणीपुरवठा करू शकत नसल्याने नागरिक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी बिलाची रक्कम भरण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे अनेकांना याचा नाहक भुर्दंड पडत आहे. तसेच काही नळ जोडण्या या बंद पडल्या आहेत. त्यांनाही बिले येत आहेत. व त्याचा नाहक भुर्दंड सर्वसामान्य नागरिकांना भरावा लागत आहेत. यामध्ये विशेषतः अनेक रहिवासी सोसायटी यांना या मुळे आर्थिक नुकसान सहन करावा लागत आहे. या साऱ्याचा विचार करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने अभय योजना लागू करून पाणी बिलावरील व्याजाचे दंड माफ करून मुळ रक्कम बिल म्हणून स्वीकारावी अशी मागणी आमदार किसन कथोरे यांनी केले आहे. अभय योजना लागू झाल्यानंतर नागरिका त्वरित बिल भरतात असा यापूर्वीचा अनुभव असून आहे. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची कोट्यावधी रुपयांची असलेली थकबाकी या निमित्ताने वसूल होईल असा विश्वास आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केला. यावर राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी तातडीने बैठक सर्व बाबी तपासून 1 एप्रिल 2025 पासून ही योजना लागू करण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. योजना लागू झाल्यास याचा मोठा फायदा अंबरनाथ बदलापूर मधील थकबाकीदारांना होणार आहे.

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत

# आशा स्वयंसेविकांचा सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वैद्यकिय आरोग्य विभाग, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात आशा स्वयंसेविकेच्या कार्यक्षेत्रात माता व नवजात मत्यू झालेला नाही अशा आशा स्वयंसेविकांचा पुष्पगुच्छ व प्रशस्ती पत्र देवून सन्मान करणे करीता व राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात महानगरपालिका अंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील प्रकल्प अंमलबजावणी आराखडानुसार आशा स्वयंसेविकांना समाजात सन्मान करुन देण्यासाठी व त्यांना पुन्हा अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देण्याकरिता उत्कृष्ट कार्य करणाऱ्या / काम करणाऱ्या तीन आशा स्वयंसेविकेस महानगरपालिकास्तरीय पुरस्कार देण्यासाठी दि. १८/०३/२०२५ राजी सकाळी ११.०० वा. गाजेंगी हॉल, कोंबडपाडा, भिवंडी येथे "आशा दिवस व सर्वोत्कृष्ट आशा स्वयंसेविका पुरस्कार" कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.




सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती मा. श्री. देवीदास पवार, अति. आयुक्त-१ व मा. श्री. विठ्ठल डाके, अति. आयुक्त-२ यांचे हस्ते उपस्थित मा.श्रीम.डॉ. अनुराधा बाबर, उप-आयुक्त, शिक्षण विभाग, मा. श्रीम. प्रणाली घोंगे, उप-आयुक्त, समाज कल्याण विभाग, मा. डॉ. संदिप गाडेकर, वैद्यकिय आरोग्य अधिकारी व डॉ. बुशरा सय्यद, माता, बाल संगोपन अधिकारी व वैद्यकिय आरोग्य विभागांतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच १९ नागरी आरोग्य केंद्रातील सर्व वैद्यकिय अधिकारी, पी.एच.एन., स्टाफ नर्स, ए.एन.एन., व आशा स्वयंसेविका यांचे उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

सदर कार्यक्रमांतर्गत मा. श्री. देवीदास पवार, अति. आयुक्त-१ व मा. श्री. विठ्ठल डाके, अति. आयुक्त-२, मा. श्रीम. डॉ. अनुराधा बाबर, उप-आयुक्त, शिक्षण विभाग, मा. श्रीम. प्रणाली घोंगे, उप-आयुक्त, समाज कल्याण विभाग, यांचे हस्ते श्रीम. अर्चना रघुनंदन थोरात, इदगाह स्लेंटर हाऊस, नागरी आरोग्य केंद्र यांना प्रथम पुरस्कार रु. ५०००/- धनादेश, श्रीम. बसरीन इस्माईल शेख, मिल्लतनगर नागरी आरोग्य केंद्र यांना द्वितीय पुरस्कार रु. ३०००/- घनादेश व श्रीम. रत्ना क्रिष्णकांत गुडेलवार, नवीवस्ती नागरी आरोग्य केंद्र यांना तृतीय पुरस्कार रु. २०००/- धनादेशाद्वारे या आशा स्वयंसेविकेस सर्वोत्कृष्ट आशा स्वयंसेविका पुरस्कार देऊन प्रमाणपत्र व ट्रॉफीसह सन्मानीत करण्यात आले.

तसेच आशा दिवस कार्यक्रम अंतर्गत आशा स्वयंसेविका / गटप्रवर्तका यांची रांगोळी, कविता, नृत्य इत्यादी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त आशा स्वयंसेविका यांनी भाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढविण्यात आली.

तरी भिवंडी शहरातील नागरीकांनी आरोग्य विषयक कामकाजामध्ये आशा स्वयंसेविका यांना सहकार्य करुन सर्व नागरीकांचे आरोग्य निरोगी ठेवणेस आवाहन महानगरपालिका स्तरावरुन करणेत येत आहे.

# कल्याण विकास फाऊंडेशनतर्फे छावा चित्रपटाचे मोफत स्क्रिनिंग

## फाऊंडेशनच्या अध्यक्ष हेमलता नरेंद्र पवार यांचा पुढाकार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : "हाथी घोड़े तोप तलवारें, फौज तो तेरी सारी है.. पर जंजीर में जकड़ा राजा मेरा, अब भी सब पे भारी हैं"... धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य आणि बलिदानावर आधारित छावा चित्रपटातील एक भारदस्त आणि संभाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारा भारदस्त संवाद. प्रदर्शित होऊन एक महिना उलटल्यानंतरही छावा चित्रपट हाऊसफुल्ल चालत असून शिवप्रेमींचा मोठा प्रतिसाद मिळत असून कल्याण विकास फाऊंडेशनतर्फे कल्याण पश्चिमेतील नागरिकांसाठी आयोजित या चित्रपटाच्या मोफत स्क्रिनिंगला मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. कल्याण विकास फाऊंडेशनच्या अध्यक्ष हेमलता नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेलं हिंदवी स्वराज्य टिकवण्यासाठी आणि हिंदू धर्माच्या रक्षणासाठी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांनी गाजवलेला अतुलनीय पराक्रम तसेच दिलेले बलिदान म्हणजेच हा छावा चित्रपट. केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशभरातून छावा चित्रपट पाहण्यासाठी शिवप्रेमी, इतिहास प्रेमींची मोठी गर्दी होत आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण विकास फाऊंडेशनच्या अध्यक्ष हेमलता नरेंद्र पवार यांच्या संकल्पनेतून कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्रमांक 32 सिद्धेश्वर आळी येथील नागरिकांसाठी, भाजप कार्यकर्त्यांसाठी हा चित्रपट मोफत दाखवण्यात आला. यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे हे बलिदान आणि झालेला अतोनात छळ पाहून सर्वांचे डोळे भरून आल्याचे दिसले. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यानंतर त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकत धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांनी गाजवलेला पराक्रम आणि त्यानंतर आपल्या धर्म रक्षणासाठी दिलेले हे बलिदान अजिबात विसरता कामा नये. कारण छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्यामुळे आज आपण हे सोनेरी दिवस पाहत आहोत. त्यामुळे हा छावा चित्रपट प्रत्येक व्यक्तीने पाहिला पाहिजे आणि विशेष म्हणजे आपली नवी पिढी, लहान मुले यांनाही तो दाखवला पाहिजे असे मत यावेळी कल्याण विकास फाऊंडेशनच्या अध्यक्ष हेमलता पवार यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी कल्याण विकास फाऊंडेशन अध्यक्षा हेमलता नरेंद्र पवार, भाजपा कल्याण जिल्हा सरचिटणीस अमित धाक्रस, हिमांशु नरेंद्र पवार, एस.एम जोशी, राजेंद्र फडके, महेश केळकर, महेश चौधरी, समृद्धी देशपांडे, स्नेहल सोपारकर, जयश्री देशपांडे, काका गवळी, संदिप बेंद्रे, स्वाती पाचघरे, श्री देवस्थळी, गणेश पोखरकर, विकास साळवी, विलास तेली,दिपा शाह तसेच कल्याण विकास फाऊंडेशचे पदाधिकारी यांच्यासह वार्ड क्रमांक 32 सिद्धेश्वर आळी येथील कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिवंडीतून टोरंट पावर कंपनी हटविण्यासाठी खा.बाळ्या मामांनी घेतली केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल खट्टर यांची भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : भिवंडीतून टोरंट पावर हटविण्यासाठी खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांनी केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल खट्टर यांची भेट घेऊन मागणी केली.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहर व ग्रामीण भागात वीज वितरण व वीज बिल वसूल करणाऱ्या टोरंट पावर कंपनीच्या मनमानी कारभारा विरोधात खासदार बाळया मामा यांनी केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल खट्टर यांची दिल्ली येथे भेट घेत टोरंट पावर हटविण्याची मागणी केली.



भिवंडीतील नागरिकांना गेल्या 18 वर्षांपासून टोरेंट पॉवर कंपनीच्या मनमानी कारभाराचा त्रास सहन करावा लागत असून 1 एप्रिल 2024 पासून कंपनीने विजेच्या दरात सरासरी 6% वाढ लागू केली आहे.ज्यामुळे सामान्य नागरिकांसोबतच पावरलूम उद्योगावरही प्रचंड आर्थिक भार पडला आहे. याशिवाय व्यावसायिक व औद्योगिक दरांमध्ये 3 टक्के आणि 5 टक्के वाढ केल्याने भिवंडीच्या पावरलूम उद्योगाला मोठा फटका बसला आहे.

टोरेंट पॉवर कंपनीकडून ग्राहकांवर वीज चोरीचे खोटे गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक वसुली केली जात असून जलद वेगाने फिरणारे मीटर बसवून विजेचे बिल अनावश्यकरित्या वाढवले जात आहेत व ग्राहकांच्या मीटरची योग्य तपासणी न करता त्यांना अव्वाच्या सव्वा बिले पाठवली जात असल्याने भिवंडीकरांमध्ये टोरंट पावर विरोधात प्रचंड संताप पसरला असून टोरंट पावर शहरातून हटविण्यात यावी तसेच पर्यायी वीज वितरण कंपनीची व्यवस्था करावी अशी मागणी खासदार बाळया मामा यांनी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

केंद्रीय ऊर्जा मंत्री खट्टर यांनी आपल्या मागणीची दाखल घेतली असून लवकरच टोरंट पावर कंपनीच्या मनमानी कारभाराला चाप बसवला जाईल असे आश्वासन खट्टर यांनी आपल्याला दिले असल्याचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी म्हटले आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना एकसारखा निधी देण्याबाबत निर्णय घेऊ

**- अतुल सावे**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यात राबविल्या जाणाऱ्या विविध घरकुल योजनांमधून लाभार्थ्यांना वेगवेगळे अनुदान दिले जाते. या योजनांना एकसारखे अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्याचे निर्देश विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले असून त्यानुसार मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, असे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेदरम्यान सभापती प्रा. शिंदे यांनी निर्देश दिले. सदस्य सर्वश्री विक्रम काळे, एकनाथ खडसे, श्रीमती भावना गवळी यांनी या चर्चेत सहभाग घेतला. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री श्री. सावे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना सध्या चार टप्प्यांमध्ये १.२० लाख रुपये दिले जातात. ही रक्कम वाढवून देण्याबाबत तसेच या घरकुलांना पाच ब्रास वाळू देण्याबाबत देखील मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील ३२९ लाभार्थ्यांची नोंदणी आवास सॉफ्ट प्रणालीवर करण्यात आली असून त्यापैकी २४१ लाभार्थ्यांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी १७१ लाभार्थ्यांना १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला असून उर्वरित लाभार्थ्यांची पी एफ एम एस प्रणालीवर बँक खाते पडताळणी प्राप्त होताच पहिला हप्ता वितरित करण्यात येईल, असे श्री. सावे यांनी यावेळी सांगितले.

# बारवी धरणाकरिता अतिरिक्त जमिन संपादित करुन शेतकऱ्यांना मोबदला देणार

**- उद्योग मंत्री उदय सामंत**

मुंबई : ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील बारवी धरणासाठी शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आलेली आहे. या धरणात बुडीत होत असलेली अतिरिक्त 61 हेक्टर जमिन संपादित करण्यात येऊन बाधित शेतकऱ्यांना तातडीने मोबदला देण्यात येईल, असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विधानसभेत सांगितले.बारवी धरणातील संपादित जमिनी बाबत सदस्य किसान कथोरे यांनी प्रश्न उपस्थित केला होता.या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना उद्योगमंत्री सामंत म्हणाले, बारवी धरणाच्या टप्पा क्रमांक एक आणि टप्पा क्रमांक दोन मधील 203 प्रकल्प बाधितांना सेवेत सामावून घेण्यासाठी एमआयडीसी तसेच महानगरपालिकांमध्ये प्रयत्न केले जातील. या प्रकल्पातील १२०४ पैकी ५७८ प्रकल्पबाधितांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पाणी वापराच्या समन्वय तत्वावर सामावून घेतले आहे.

# नागरिकांना रक्तदान करण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

ठाणे : असे म्हणतात की, एका व्यक्तीने रक्तदान केल्यानंतर त्या रक्ताचे सर्व महत्त्वाचे घटक बाजूला करून पाच लोकांचा जीव वाचविला जाऊ शकतो. म्हणूनच "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" असे मानले जाते. ठाणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून रुग्णांना लागणाऱ्या रक्ताचा तुटवडा भासत असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे आणि जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी केले आहे.तरी, इच्छुक रक्तदात्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी, महाविद्यालयीन तरूण-तरूणींनी स्वेच्छेने रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा आणि गरजू रुग्णांना मदत करावी व रक्तदान करून या सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे. तसेच रक्तदान शिबिर आयोजित करावयाचे असल्यास नागरिकांनी जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी गिरीश चौधरी (9869685282) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन ठाणे जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024